

# वार्षिक अहवाल

## इतिहास

## 2021-22

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री


DINESH KACHKURE
ASSISTANT PROFESSOR

VIJAY PANDE
HEAD & ASSO. PROF.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंत 19

**कार्यक्रमाचे नाव:** **छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती व्याख्यान**

**विभाग:** इतिहास

**कार्यक्रम पद्धती:** व्याख्यान

**दिनांक:** **19 फेब्रुवारी 2022**

**वेळ:** 9.15 स.

**सुत्रसंचलन:** प्रा. नितीन मालेगावकर

**अध्यक्ष:** डॉ. एस. आर. टकले

**सहभागी:** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
व राजर्षी शाहू महिविद्यालय, पाथ्री
एकूण : 55

**स्वरूप:** ऑफलाईन-ऑनलाईन -महाविद्यालयीन

**विषय:** स्वराज्य निर्मितीत शहाजी महाराजांचे योगदान

**वक्ते:** **डॉ. कामाजी डक**

**उद्दिष्टे:**

1. छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करणे.
2. जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानातून विद्यार्थ्यांना ज्ञान संक्रमीत करणे.
3. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार संक्रमीत करणे.

**व्याख्यानाचा गोषवारा:**

महाविद्यालयात श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री यांच्या इतिहास विभागांच्या वतीने दिनांक 19 फेब्रुवारी 2022 रोजी सकाळी 9:15 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात डॉ. कामाजी डक, पोस्ट डॉक्टरेट फेलो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे “स्वराज्य निर्मितीत शहाजी महाराजांचे योगदान” या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. कामाजी डक म्हणाले की, स्वराज्य उभारणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व म्हणून मोठी व महत्त्वाची भूमिका नक्कीच आहे. परंतु या स्वराज्याची पार्श्वभूमी तयार करण्याचे काम शहाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांचे राहिलेले दिसते. शहाजी महाराजांनी आदिलशाही, निजामशाही, मुघल या सत्तांच्या पदरी नोकरी केली

होती. त्याचा अनुभव तर त्यांच्या पदरी होताच, परंतु त्याचबरोबर या सत्तांची बलस्थाने, कच्चे दुवे यांची पूर्ण माहिती त्यांना होती. तसेच या सर्व सत्तामध्ये शहाजीराजांनी आपल्या कर्तुत्वाद्वारे ठसा उमटवलेला असल्याने एक प्रकारचा स्वतःचा ठसा दबाव या सत्तावन वर बनवलेला होता. त्यामुळे आपण जर शिवाजी महाराजांना हात घातला तर शहाजी महाराज शांत बसणार नाहीत याची जाणीव या सत्तांना होती. तसेच भातवडीच्या लढाईत शहाजी महाराजांनी भातवडीचे धरण फोडून जो गनिमीकाव्याचा परिचय दिला तोही महत्वाचा होता. शिवाजी महाराजांच्या शिक्षणाची व्यवस्था उत्तम केल्याने शिवाजी महाराज ज्ञान पारंगत होऊन पुढे स्वतंत्र राज्यव्यवहारकोश त्यांनी करून घेतला”

हा कार्यक्रम ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही स्वरूपामध्ये घेण्यात आला. राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन मालेगावकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. महेश थोरात यांनी केले. यावेळी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. केशव लहाने हे उपस्थित होते.




कार्यक्रम पत्रिका






स्वराज्य निर्मितीत शहाजी महाराजांचे योगदान वर व्याख्यान देतांना डॉ. कामाजी डक




छत्रपती शिवाजी महाराज जयंती प्रसंगी सर्व कर्मचारी



# शैक्षणिक अभ्यास सहल

**कार्यक्रमाचे नाव:** **शैक्षणिक अभ्यास सहल**

**विभाग:** इतिहास

**कार्यक्रम पद्धती:** ऐतिहासिक स्थळांना भेट

**दिनांक:** **28 एप्रिल 2022**

**वेळ:** 11.00 स.

**सहभागी:** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री,

- एकूण : 20

**स्वरूप:** स्थळ भेट

**उद्दिष्टे:**

1. विद्यार्थ्यांना स्थानिक इतिहास म्हणून सांगणे.
2. परिसरातील ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे.
3. परिसरातील ऐतिहासिक स्थळांचे अध्ययन करणे.
4. स्थळ भेट देऊन विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जागृती निर्माण करणे.

**सहलचा गोषवारा:**

महाविद्यालयाच्या इतिहास विभागाची सहल औरंगाबाद तालुक्यातील लोकुत्तरा विहार, चौका येथे दिनांक 28 एप्रिल 2022 रोजी सकाळी 11 वाजता काढण्यात आली. या ठिकाणी असलेल्या बुद्ध मूर्ती विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आल्या. तसेच बौद्ध धर्मातील तत्त्वज्ञान, गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान यांची माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. ही सहल महाविद्यालयातील इतिहास विभाग, अर्थशास्त्र विभाग व समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आली. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आर्थिक पर्यटन या संदर्भामध्ये माहिती देऊन स्थानिक बाजार पेठ कशी निर्माण होते याविषयी माहिती सांगितली. तर समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना धार्मिक पर्यटन या विषयावर माहिती सांगण्यात आली. या सहलीस अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, समाजशास्त्र विषयाच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. मंजुषा नळगिरकर, इतिहास विभागाचे विभागप्रमुख विजय पांडे व डॉ. दिनेश कचकुरे उपस्थित होते.




REDMI K20 PRO
VIJAY PANDE


पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.
REDMI K20 PRO
VIJAY PANDE

# भित्तीपत्रक प्रकाशन

इतिहास विभागाच्या वतीने 29 एप्रिल 2022 रोजी पूजा ढोके, प्राजक्ता इंगळे, आकांक्षा क्षीरसागर, मंजुषा पेहरकर, अफरोज शेख, रोहन बनसोडे या विद्यार्थ्यांनी तयार केलेले भारताची राष्ट्रीय प्रतीके हे भित्तीपत्रक पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख सर्जेराव बनसोडे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. भित्तीपत्रकात विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वज तिरंगा, राष्ट्रचिन्ह राजमुद्रा, राष्ट्रीय ब्रीदवाक्य सत्यमेव जयते, राष्ट्रीय गीत वंदे मातरम, राष्ट्रगीत जनगणमन याविषयीची माहिती टाईप करून प्रिंट स्वरूपात प्रकाशित केली. या भित्तीपत्रकाच्या प्रकाशन प्रसंगी विजय पांडे व दिनेश कचकुरे यांची उपस्थिती होती.



# अतिथी व्याख्यान

इतिहास विभागाच्या वतीने 29 एप्रिल 2022 रोजी पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख सर्जेराव बनसोडे यांचे बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना 10:50 ते 11:40 यावेळेत आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास या पेपरमधील गांधीयुग या विषयावर व्याख्यान दिले. हा कार्यक्रम Linkage activity अंतर्गत घेण्यात आला.



**व्हाट्सअप ग्रुप:**

बीए प्रथम वर्ष, बीए द्वितीय वर्ष, बी ए तृतीय वर्ष या वर्गांचे इतिहास विषयासाठी स्वतंत्र व्हाट्सअप ग्रुप बनवण्यात आले. या ग्रुपवर इतिहासाचे व्हिडिओ, ऑडिओ, पीडीएफ फाईल, टेक्स्ट मेसेज, विद्यापीठाचे सर्कुलर, टाईम टेबल, सूचना पोस्ट करण्यात आले.

**ऑनलाइन टेस्ट:**

बीए प्रथम वर्ष, बीए द्वितीय वर्ष, बी ए तृतीय वर्ष या वर्गांच्या ऑनलाइन टेस्ट Google Quiz द्वारा घेण्यात आल्या. प्राचीन भारत- 2, इतिहासाच्या शाखा- 2, इतिहासलेखनशास्त्र-4, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास-3, मराठ्यांचा इतिहास-4, मराठवाड्याचा इतिहास-2, मुघलाचा इतिहास-8, आधुनिक भारत-6, जगाचा इतिहास-5, अशा एकूण 36 ऑनलाईन टेस्ट घेण्यात आल्या.

**प्रवेशासाठी प्रयत्न:**

महाविद्यालयातील प्रवेश संख्या वाढावी यासाठी गावांना भेटी देण्यात आल्या.

**« GENDER WISE STUDENT STRENTH «**

| CLASS | MALE ♂ | FEMALE ♀ | TOTAL = |
|---|---|---|---|
| FYBA | 24 | 19 | **43** |
| SYBA | 10 | 11 | **21** |
| TYBA | 7 | 8 | **15** |
| TYBA MAIN | 0 | 1 | **1** |

**« CATEGORY WISE STUDENT STRENTH «**

| CLASS | GEN | NT | OBC | SC | ST | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|
| FYBA | 9 | 11 | 15 | 5 | 3 | **43** |
| SYBA | 10 | 3 | 4 | 4 | 0 | **21** |
| TYBA | 8 | 1 | 5 | 0 | 0 | **15** |
| TYBA MAIN | 0 | 1 | 0 | 0 | 0 | **1** |